MHLA050002302021

नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२१
भागिरथीबाई वि. शासन

## नि.क्र.८३ खालील आदेश

**०१.** वादीतर्फे अर्ज देवून नमूद करण्यात आले की, वादीतर्फे महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा शिरुत ताजबंद येथील अधिकाऱ्याची जबानी नि.क्र.७२ लगत नोंदवत असताना इल्केट्रानिक अभिलेखांचा दाखला देण्यासाठी सरतपास दि.२९/०७/२०२५ रोजी तहबुक झाला. पुढील तारीख २१/०८/२०२५ ठेवण्यात आली. दरम्यान दि.१३/०८/२०२५ रोजी वादीच्या वकिलांचे वडिलांना ब्रेन स्ट्रोकसाठी आणि दि.१९/०८/२०२५ रोजी वादीच्या वकिलांच्या आईला गंभीर आजारासाठी सुरुवातीला लातूर येथे व त्यानंतर हैद्राबाद येथे दाखल करावे लागले. दि.०९/०९/२०२५ पर्यंत त्यांच्यावर उपचार चालू होते. या कारणास्तव वादीचे वकील न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे, दि.१९/०९/२०२५ रोजी बॅक अधिकाऱ्याचा जबाब पुराव्यात वाचता येणार नाही असा आदेश पारीत झाला. नैसर्गीक आणि आपात्कालीन वैद्यकीय अडचणीमुळे सदर प्रकरणी वकील हजर राहू शकले नाहीत.त्यामुळे, नि.क्र.७२ वर झालेला वरील आदेश रद्दबातल होण्यासाठी अर्ज व शपथपत्र देवून विनंती करण्यात आली.

**०२.** अर्जास दिलेल्या म्हणण्यानूसार न्यायालयाने योग्य ते आदेश पारीत करावेत असे नमूद आहे.

**०३.** वादीचे वकिलांचे आई-वडिलांना आजारपणास्तव आंतररुग्ण म्हणून दोन वेगवेगळया इसपितळात दाखल व्हावे लागले व त्यात वादीच्या वकिलांचा स्वाभाविकपणे वेळ खर्च झाला ही बाब शपथपत्रावरुन दिसून येते. त्यामुळे, नि.क्र.७२ वरील आदेश रद्द करण्यात येतो. मात्र, संबंधीत बॅकेचा साक्षीदार व अन्य साक्षीदार यांना नेमलेल्या तारखेस वादीने न्यायालयात हजर ठेवावे

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०४/११/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**